# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1. साथरोग प्रतिबंध कायदा 1897 चे कलम 2, 3 व 4

2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.

3. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1, दि23.03.2020 व दि.25.03.2020दि.13.04.2020दि15.04.2020, दि.17.04.2020,दि.18.04.2020 व दि.02.05.2020

4.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 कावी दि.31/03/2020 व दि.13/04/2020दि.17/05/2020

5- या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/ सुधारीत आदेश 115 दि.09/05/2020

6. महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1 दि.17/05/2020

---

जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/आदेश 132 दिनांक.17.05.2020

**आदेश:-**

**ज्याअर्थी,** जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये म्हणुन सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक निर्माण होऊ शकतो या मुळे फौजदारी प्रकीया संहिता 1973 चे कलम 144(1)(3) अन्वये संपुर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.3 च्या अधिसुचनेत किराणामाल विक्री करणारे दुकाणे व भाजीपाला विक्री सुरु करणे बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार संदर्भीय क्र. 5 अन्वये किराणा माल विक्री दुकाने, भाजीपाला विक्री करणारे दुकाने, दुध विक्री केंद्र, परवाना असलेले चिकन /मटन शॉप, बेकरी ,स्वीट मार्ट संबंधीत दुकाने प्रतिदिन सकाळी 8.00 ते दु 1.00 या वेळेतच सुरु करण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच संदर्भीय क्र. 6 च्या आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि.31/05/2020 पर्यंत वाढवलेला आहे.

**त्याअर्थी,** मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हिंगोली **खालील प्रमाणे ठरवुन देण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दररोज सकाळी 08.00 ते दुपारी 01.00 या वेळेत किराणा माल विक्री दुकाने, भाजीपाला विक्री करणारे दुकाने, दुध विक्री केंद्र, परवाना असलेले चिकन /मटन शॉप, बेकरी ,स्वीट मार्ट संबंधीत दुकाने चालु राहण्याची या व्दारे परवानगी देण्यात येत आहे.**

**तसेच बंदच्या कालावधी मध्ये घरपोच सेवा Home Delivery Service सुध्दा अनुज्ञेय असेल.अधिकृत पासधारक यांच्या मार्फत जिवनावश्यक वस्तु जसे, किराणा, भाजीपाला, फळे व औषधी ईत्यादीचा पुरवठा करण्यासाठी Home Delivery Service अनुज्ञेय असेल.**

**सदरील उदयोग सुरु करते वेळेस खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.**

1. संबंधितानी दुकानाची सुरुवात करताना संपुर्ण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरुवात करावी.
2. दुकानातील कामगार/ खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव, संर्पकाचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
3. दुकानदारानी व त्यांच्या सोबत काम करणा-या कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड माक्सने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
4. खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन ग्राहाकामध्ये एक मिटरचे अंतर राहील यांची दक्षता संबधीत विक्रेत्यांनी घ्यावी. तसेच Sanitizer उपलब्ध ठेवण्यात यावेत.
5. तसेच खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांसाठी दु कानासमोर एक मिटरचे अंतरांनी गोल/चौकोन आखावेत.
6. दररोज कामावर येणा-या कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
7. दुकानदारांनी कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. दुकानाच्या परिसरामध्ये कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व साबण यांची व्यवस्था करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन उदयोग धंदयाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे ( social Distance ) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षततेच्या उपाय योजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

**त्या नुसार सामान खरेदीसाठी नागरीक केवळ पायी येऊ शकतात, त्यांना दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांचा वापर करता येणार नाही.नागरीकांची वाहने रस्त्यावर येऊ नये याकरीता आवश्यक त्या ठिकाणी बॅरीकेटींग चा वापर करावा .**

**या आदेशामध्ये नमुद कालावधी वगळता इतर कालावधीमध्ये कोणासही घराच्या बाहेर पडता येणार नाही.तसेच आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.**

संबंधित आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस स्टेशन, सर्व जि.हिंगोली यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हे आदेश दिनांक.17/05/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर

1.मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-32.

2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव

1.पोलीस अधिक्षक हिंगोली

2.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली

3.उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत

4.जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी हिंगोली.

5.जिल्हा निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.

6.उपविभागीय पोलीस अधिकारी / पोलीस निरिक्षक सर्व यांना (मार्फत पोलीस अधिक्षक हिंगोली).

7.तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना. यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, आदेशात नमुद केल्या प्रमाणे आपल्या स्तरावरुन कार्यवाही अनुसरण्यात यावी.

8.मुख्याधिकारी नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

9.जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिधीस्तव.

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

Scanned by CamScanner